लाल बहादुर शास्त्री विद्यालय तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनात प्रथम....

दि. 25 सप्टेंबर 2026 लातूर: समाज विकास प्रशाला चाकूर येथे 3 सप्टेंबर ते 15 सप्टेंबर या कालावधीत संपन्न झालेल्या तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनात लाल बहादूर शास्त्री विद्यालयातील इयत्ता 10 वी तील मेघा गायकवाड या विद्यार्थीनीने तयार केलेल्या घरगुती कचऱ्यापासून बायोगॅसची निर्मिती करण्याच्या उपकरणाला प्रथम क्रमांक मिळाला.

तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनात एकूण दहा शाळांनी व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. लाल बहादूर शास्त्री विद्यालयाचे नाव लौकिकास साजेल असे यश मेघा गायकवाड हिने मिळवले. त्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक प्रवेक्षक शिक्षक या सर्वांनी मेघाचे अभिनंदन केले आहे.